**ठळक बातम्या**

- केवळ परीक्षेत गुण मिळवण्याऐवजी विषयावर ज्ञान मिळवण्यासाठी अभ्यास करण्याचं प्रधानमंत्र्यांचं विद्यार्थ्यांना ‘परीक्षा पे चर्चा’ मधून आवाहन
- कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फ्रान्सला रवाना
- लोकसभा आणि राज्यसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा

**आणि**

- बेंगळुरूमध्ये एअरो इंडिया प्रदर्शनाला सुरुवात

**<><><><><>**

विद्यार्थ्यांनी परीक्षा देताना केवळ गुण मिळवण्याचा विचार न करता संबंधित विषयाचं ज्ञान मिळवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे, असा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज परीक्षा पे चर्चा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना दिला.

*विद्यार्थ्यांची क्षमता, अंगभूत कौशल्य आणि कामातला आनंद या गोष्टींना परीक्षेतले गुण, स्पर्धा आणि इतरांशी तुलना यापेक्षा महत्त्व दिलं पाहिजे, असं प्रधानमंत्र्यांनी शिक्षक, आणि पालकांना सांगितलं. परीक्षेप्रमाणेच जीवनशैली विषयक अनेक प्रश्नांना मोदी यांनी उत्तरं दिली.*

*यावेळी देशातल्या विविध राज्यातून आलेल्या  ३६ विद्यार्थ्यांशी प्रधानमंत्र्यांनी नवी दिल्लीत संवाद साधला. परीक्षेविषयी मार्गदर्शनासह प्रधानमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना सुदृढ आरोग्य राखण्याबाबत सल्ला दिला. आहारात बाजरी आणि भाज्यांचा समावेश करायला त्यांनी सांगितलं. चांगल्या आरोग्यासाठी चांगल्या झोपेची आवश्यकता प्रधानमंत्र्यांनी समजावून दिली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरं दिली. तसंच त्यांना*

*वेळेचं महत्व समजावून सांगितलं. अवघड वाटणाऱ्या विषयाचं आव्हान स्वीकारून  त्याचा अभ्यास करण्याचं आवाहनही प्रधानमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना केलं. राज्यातही विविध ठिकाणी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.*

**<><><><>**

नेपाळमधल्या विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. तिथल्या CBSE शाळांमध्ये या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण झालं. त्यात ६ वी ते ११ वी या वर्गात शिकणारे विद्यार्थी, त्यांचे शिक्षक आणि पालक उपस्थित होते.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज फ्रान्सच्या दौऱ्यावर रवाना झाले. पॅरिसमधे आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सह-अध्यक्षपद ते भूषवतील. व्यापक जनहिताच्या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयावर परिषदेत चर्चा होणार असून जगातल्या विविध राष्ट्रांचे नेते आणि तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रमुख त्यात सहभागी होणार आहेत. याखेरीज फ्रान्स आणि भारताचे धोरणात्मक संबंध वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीनं मॅक्रॉन यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करणार असल्याचं मोदी यांनी प्रयाणापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

फ्रान्सचा दौरा आटोपून प्रधानमंत्री अमेरिकेला जाणार आहेत. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रंप यांच्या पुनरागमनानंतरच्या या भेटीसाठी आपण उत्सुक असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर स्नान केलं. नंतर त्यांनी अक्षयवट आणि बडा हनुमान मंदिर इथेही भेट दिली. महाकुंभात आतापर्यंत ४३ कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केलं असून तो येत्या २६ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.

**<><><><><>**

लोकसभेत आज अर्थसंकल्पावरच्या चर्चेला पुन्हा सुरुवात झाली. २०२५-२६ वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात कॉरपोरेट्सना झुकतं माप देण्यात आलं असून जनतेच्या बेरोजगारी, महागाई या समस्यांकडे दुर्लक्ष झालं आहे, असा आरोप द्रमुकचे दयानिधी मारन यांनी केला. भारतीय अर्थव्यवस्थेची गती मंदावली आहे, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयानं आजवरची नीचांकी पातळी गाठली आहे, अशी टीका त्यांनी केली.

नोटबंदीच्या वेळी जाहीर केलेलं कोणतंही उद्दिष्ट साध्य करण्यात सरकार अपयशी ठरलं आहे, असं काँग्रेसच्या मनीष तिवारी यांनी सांगितलं. अर्थसंकल्पात मध्यमवर्गाला कर सवलत देऊ केली असली तरी गेली पाच वर्ष या सवलतीची मागणी होत होती, असं ते म्हणाले. अर्थसंकल्पात दाखवलेल्या वित्तीय तुटीबद्दल त्यांनी सवाल उपस्थित केले तसंच देशातल्या कृषी क्षेत्राला अनेक समस्या भेडसावत असल्याचंही त्यांनी सभागृहात सांगितलं.

या चर्चेत भाग घेताना भाजपा खासदार अनुराग सिंह ठाकूर यांनी अर्थसंकल्पाची प्रशंसा केली. या अर्थसंकल्पात प्रत्येक क्षेत्रासाठी विक्रमी

निधी देण्यात आला असून राष्ट्रीय हिताची पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यसभेत आज अर्थसंकल्पावरची चर्चा सुरू झाली. विद्यमान सरकारच्या काळात देशाचा आर्थिक विकास दर घसरला आहे, असा आरोप माजी अर्थमंत्री आणि काँग्रेस खासदार पी. चिदंबरम यांनी केला. बेरोजगारीबद्दलची निश्चित आकडेवारी सरकारनं दिली नसल्याची टीका त्यांनी केली. सध्या तरुणांमध्ये १० टक्के तर पदवीधरांमध्ये १३ टक्के बेरोजगारी दर आहे, मात्र सरकारनं देशात निव्वळ ३ पूर्णांक २ दशांश टक्के बेरोजगारी असल्याचं म्हटलं आहे, असा आरोप चिदंबरम यांनी केला.
या आरोपांना उत्तर देताना सभागृहाचे नेते जे पी नड्डा यांनी सरकारनं योजलेल्या विविध उपायांचा उल्लेख केला. हा अर्थसंकल्प राष्ट्रीय विचारांचा आणि सर्वसमावेशक असल्याचं भाजपा खासदार डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना सांगितलं. देशातल्या सर्व क्षेत्रांना विशेषतः मध्यमवर्गाला यातल्या निर्णयांचा मोठा फायदा होणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना २०१६ ला सुरू झाल्यापासून आतापर्यंत लाभार्थ्यांना १० कोटी एलपीजी जोडण्या दिल्या आहेत, अशी माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी राज्यसभेत एका लिखित प्रश्नाला उत्तर देताना दिली. एलपीजी जोडणीसाठी

अजून २९ लाख अर्ज प्रलंबित असल्याचंही त्यांनी सांगितलं. हे अर्ज मंजूर करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नाही असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रेल्वे वाहतुकीसाठी विजेची वाढती गरज लक्षात घेऊन त्याच्या पुरवठ्यासाठी आता अणुऊर्जेच्या पर्यायाचा वापर करण्यात येणार आहे, अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्यसभेत एका लेखी उत्तरात दिली. त्यासाठी रेल्वे मंत्रालयाने न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन इंडिया लिमिटेड आणि वीज मंत्रालयाशी संपर्क साधला आहे, असंही वैष्णव यांनी आपल्या उत्तरात सांगितलं आहे.

**<><><><><>**

जनगणनेला विलंब झाल्यामुळे देशातले जवळपास १४ कोटी लोक अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, त्यामुळे सरकारने लवकरात लवकर जनगणना करावी अशी मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी केली. राज्यसभेत शून्य प्रहरा दरम्यान त्या बोलत होत्या.

**<><><><><>**

सुरक्षा व्यवस्था मजबूत असेल तरच शांतता प्रस्थापित करणं शक्य आहे, त्यानंतरच आपण एका चांगल्या जगासाठी काम करू शकतो, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. बेंगळुरू इथं एअरो इंडिया २०२५ चं उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते.

भारतानं नेहमीच शांतता आणि स्थैर्याचं समर्थन केलं आहे, मात्र केवळ एका देशात हे शक्य नसून संपूर्ण जगासाठीच हे महत्वाचं आहे, असं राजनाथ सिंह यावेळी म्हणाले.

**<><><><>**

जागतिक आरोग्य संघटना आणि केंद्रसरकारच्या आरोग्य मंत्रालयातर्फे हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीमेला आज सुरुवात झाली. या मोहिमेचं उद्धाटन आज केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी दूरदृश्यप्रणाली द्वारे केलं. येत्या २०२७पर्यंत हत्तीरोगाच्या निर्मूलनाचं लक्ष्य साध्य करण्याचा सरकारचा संकल्प असल्याचं नड्डा यावेळी म्हणाले. आजपासून १११ जिल्ह्यांमध्ये १७ कोटी ५० लाखांहून अधिक लोकसंख्येला मोफत औषधं उपलब्ध करून दिली जातील, अशी माहितीही नड्डा यांनी दिली. महाराष्ट्रातही पालघर, नांदेड, गडचिरोली, भंडारा आणि चंद्रपूर या ५ जिल्ह्यांतल्या मिळून ३४ तालुक्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे. मोहिमेअंतर्गत दोन वर्षांपेक्षा लहान बालकं, गरोदर माता आणि गंभीर आजारी व्यक्ती वगळता सर्वांना  प्रतिबंधक गोळ्यांचा डोस देण्यात येणार आहे.

**<><><><>**

संसदेत आणि राज्य विधिमंडळांमध्ये नियोजित पद्धतीनं व्यत्यय आणणं तसंच सदस्यांचा कामकाजातला कमी होत चाललेला सहभाग याबद्दल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी चिंता व्यक्त केली. महाराष्ट्र विधिमंडळातल्या नवनिर्वाचित  सदस्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते  आज

दिल्लीत बोलत होते. कामकाजात जाणूनबुजून आणला जाणारा व्यत्यय संसदीय लोकशाहीसाठी घातक असल्याचं त्यांनी सांगितलं. विविध संसदीय समित्यांच्या कामकाजाबद्दल तसंच संसदीय भाषेत आपला मुद्दा मांडण्याबाबत त्यांनी सदस्यांना माहिती दिली.

<><><><><>

जम्मू आणि काश्मिरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. जम्मू-काश्मिरला राज्याचा दर्जा देणं, सुरथा व्यवस्था, अर्थसंकल्प या विषयावर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालयातर्फे World Audio Visual & Entertainment Summit,वेव्हज २०२५ परिषद आयोजित करण्यात येणार आहे. शहरी जीवनावर आधारित गेम आविष्कारांसाठी सिटी क्वेस्ट शेड्स ऑफ भारत हे दालन त्यात असेल. आपापल्या शहरात शाश्वत विकास उद्दिष्टांकडे प्रवासाचं प्रतिबिंब आपल्या कलाकृतीत उमटवण्याची संधी दालनात मिळेल. देशातल्या ५६ शहरांचा समावेश या संकल्पनेत आहे. येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हज कार्यक्रमात या दालनात उत्कृष्ट ठरणाऱ्या कलाकृतींचा गौरव करण्यात येईल.

//<><><><><>//